# वंचितांना शिक्षणाचे भान देणारे - श्री. गिरीश प्रभुणे

श्री. गिरीश प्रभुणे यांचे मला जाणवलेले वैशिष्ट्य असे की, त्यांची तत्त्वनिष्ठा ही भारतीय तत्त्वज्ञान आणि भारतीय पारंपरिक शिक्षणविचारांत रुजलेली आहे तर त्यांचा व्यावहारिक विचार हा, आजच्या सामाजिक समस्या सोडविण्याशी, त्यांतही विशेषतः समाजातील शेवटच्या संधी-वंचित मुलांच्या प्रश्नांशी बांधीलकी मानणारा आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी की, गिरीश प्रभुणे हे शिक्षणाकरवी समाजबदल घडवून आणणा-या पंथातील आहेत, त्यामुळे अर्थातच शिक्षण हेच त्यांच्या सामाजिक कार्याचे प्रधान क्षेत्र राहिले आहे.

मला पंचवीस वर्षांपूर्वीचे 'ग्रामायन'च्या कुटुंबातील गिरीश प्रभुणे माहीत आहेत. तो त्यांच्या जीवनातील ऊर्जाभरणीचा काळ होता. ग्रामायन ही अनौपचारिक संस्था व तिचे समाजकार्य विस्कळीत होऊनही प्रभुणे बराच काळ तेथे पाय रोवून होते, असे मला काहीसे आठवते. त्यानंतरची काही वर्षे हा त्यांचा चिंतनकाल असावा. कारण, त्यानंतर ते एकदम उठून उभे राहिले आणि 'यमगरवाडी' च्या धनगर वस्तीतल्या मुलांना शिक्षणाच्या मुशीत पकडून ठेवण्याचा, म्हणजे मुठीत वारा धरून ठेवण्याचा अवघड खेळ खेळू लागले. यमगरवाडी ही त्यांची प्रयोगभूमी होती. काही वर्षे तिथले बस्तान बसविण्यात – म्हणजे कार्यकर्त्यांची नवी फळी उभी करण्यात घालविल्यानंतर त्यांनी, या आणि अशाच मुलांसाठी चिंचवड येथे, गुरुकुल उभारण्याचा घाट घातला.

गिरीश प्रभुणे यांच्या ग्रामायनच्या ऊर्जाभरणीच्या काळात, ते तत्कालीन पत्रकारितेतून बाहेर पडून, सामाजिक कार्यक्षेत्राकडे वळले. या नव्या क्षेत्रात तीन गुरू त्यांना मिळाले.'माणूस'कार माजगावकरांनी त्यांना या कार्यक्षेत्राची संधी व ओळख दिली. त्यांच्यातील वेगळया क्षमतांची जाणीव फुलविली. व. द. देशपांडे व स. ह. देशपांडे, या देशपांडे द्वयाने, प्रभुणे यांना, समाजकार्य हे केवळ भावनांच्या पातळीवर न ठेवता, आपल्या कार्याला शास्त्रीय बैठक कशी द्यावी याचे गुरूमंत्र दिले. कामाची नेमकी उद्दिष्टे समोर ठेवून, नियोजन करणे, वेळोवेळी नोंदी ठेवणे, नोंदीतून येणा-या माहितीचे विश्लेषण करणे आणि त्याकरवी स्वतःचे शिक्षण करीत जाणे, या गोष्टींनी प्रभुणे यांची एका वैज्ञानिक दृष्टी तयार झाली. आज, चिंचवड परिसरात त्यांनी चालवलेले 'पुनरुत्थान समरसता गुरूकुलम्' ही संस्था अशा शास्त्रीय विचारांच्या पक्क्या बैठकीवर उभी आहे.

गिरीश प्रभुणे यांच्या वैचारिकतेतून उभे राहिलेले हे गुरुकुल, म्हणजे केवळ मर्यादित स्वरूपाचे शिक्षण करणारी संस्था नाही. ही 'शाळा' तर नाहीच नाही. पारंपरिक आणि शासकीय दृष्टिकोणांतून तिला 'शाळा' ठरविणे हे, एका नव्या भावीकालाभिमुख अशा दमदार प्रयोगाचे खच्चीकरण करणे होईल; ते अन्यायाचे ठरेल. पुनरुत्थान समरसता गुरूकुलम् हा, गांधीजींच्या ' नयी तालीम ' च्या जवळ जाणारा पण, आजच्या काळाच्या वंचित गटांच्या नेमक्या गरजांना भिडणारा असा, हा जीवन घडणीचा प्रयोग आहे.

भारतीय परंपरेत 'गुरुकुल' या संकल्पनेस काही विशेष स्थान मानले जाते. गुरूचे घर हेच विद्यार्थ्यांसाठी शिक्षणकेंद्र, अशी गुरूकेंद्रित शिक्षणव्यवस्था भारतात, पुरातनकाळी अस्तित्वात होती, याचे उल्लेख रामायण-महाभारतासारख्या महाकाव्यांतून आढळतात. शिकू पाहणाऱ्या मुलांनी, आपल्या विशिष्ट वयाला, शिक्षण घेण्यासाठी स्वतःचे घर सोडायचे आणि गुरूच्या घरी जाऊन वास्तव्य करायचे; तेथे, तत्कालीन औपचारिक शिक्षणाबरोबरच, एकूण व्यक्तिगत जीवनशिक्षणही आपसूक प्राप्त होता असे. तेथील प्रत्येक विद्यार्थ्याचे दैनंदिन जीवन स्वावलंबी बनायचे. त्याचबरोबर त्यांना, इतर विद्यार्थ्यांबरोबर, रहावयाचे, शिकावयाचे असल्यामुळे, सांघिक जीवनाचाही पुरेसा अनुभव मिळत असे. गुरूची आवश्यक ती सेवा करणे, हा इथला गृहीत घटक असे, आणि मोठ्या विद्यार्थ्यांनी लहानांची काळजी घेण्याची अपेक्षाही ठेवली जात असे. प्रत्यक्ष शिक्षणाच्या औपचारिक व्यवस्थेपेक्षा, त्याच्या भोवतीची ही सांघिकतेने जीवन जगण्याची व्यवस्था प्रत्यक्ष जीवनव्यवहारांच्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरत असावी, असे वाटते.

विद्यार्थ्यांचा दिनक्रम शिस्तबध्द आणि विशिष्ट नियमावलीत बांधलेला असे. त्यात पहाटे उठून, सारी आन्हिके आवरून, शुचिर्भूत होणे आणि (बहुदा पाठांतराच्या) अभ्यासास बसणे आलेच. आणखी एक, मला महत्त्वाची वाटणारी, गोष्ट अशी की, स्वयंपाक, जेवण, खरकटी भांडी, सारवण, स्वच्छता या सर्व सांघिक गरजांमध्ये श्रमविभागणीला  खास स्थान होते. आजारपणं वगैरे सांघिक अडचणी, आजार, आपत्तीमध्ये परस्पर सेवा अभिप्रेत होती, असे म्हणायला हरकत नाही.

आज, शिक्षणव्यवहाराचे अत्याधुनिक तत्त्वज्ञान रचनावादी शिक्षणाचे आहे, आणि त्यात 'करून शिकणे' या तत्त्वाला विशेष स्थान देण्यात आले आहे. परंतु याचा उगम पूर्वीच्या गुरुकुल पध्दतीत नसावा, असे वाटते. तेथे 'करणे' होते आणि 'शिकणे' ही होते. पण या दोन गोष्टी भिन्न होत्या. 'करणे' ही गोष्ट 'शिकण्याची पध्दत' म्हणून नव्हती तर ती त्या विशिष्ट व्यवस्थेत दैनंदिन जीवन जगण्याची अपरिहार्य अशी पध्दत होती; ती शिकण्याची 'रचनावादी' पध्दत मात्र नव्हती.

पुनरुत्थानात समरसता गुरूकुलम् हे ज्ञानरचनावादी शिक्षणाचा अंगभूत असा विचार विस्तारित करणारा प्रयोग आहे. इथे मुले करून, अनुभव घेऊन, आपल्या पारंपरिक ज्ञानाशी सांगड घालून शिकतात. मुलांच्या पूर्वज्ञानाला, नवा आकार देऊन प्रत्यक्षात केलेला व्यावहारिक जीवनशिक्षणाचा हा प्रयोग आहे. त्याचे फलित व  या प्रयोगाचे वेळोवेळचे निघणारे निष्कर्ष अभ्यासत राहणे मात्र गरजेचे आहे.

सध्या पुन्हा एकदा, गुरुकुल स्थापनेला बहर आलेला दिसून येतो. अनेकदा आपल्या शिक्षणसंस्थेला, किंवा शाळेला 'गुरुकुल ' नाव देऊन, आधुनिक शाळा चालविण्याचा प्रयत्न होताना दिसतो. काही वेळा या शाळा काही विशिष्ट धार्मिक अथवा राजकीय प्रणालींनी  उभारलेल्या असतात. अर्थात, याला आक्षेप असण्याचे काहीच कारण नाही. पण, विरुध्द दिशेची गोष्ट अशी की, अन्य वैचारिक अथवा राजकीय प्रणालीची मंडळी ' गुरुकुल ' नावे शिक्षणसंस्था उभ्या करताना दिसत नाहीत. नव्याने स्थापन होत असलेली

गुरुकुल संस्था आणि ज्या परंपरेतून ‘गुरुकुल’ ही संज्ञा आली ती पूर्वीची गुरुकुल पध्दती यांची काहीशी तुलना करणे मनोरंजक ठरेल.

‘गुरुकुल’ या नामाभिधानाव्यतिरिक्त, दैनंदिन व्यवहारांची शिस्तबध्द, नियमबध्द चौकट असणे हे एक फार मोठे साम्य ह्या जुन्या व नव्या गुरूकुलांतून खासच आढळते. प्रार्थनाही असतेच. पहाट उठणे, याला कुठेही विद्यार्थ्यांच्या वयोमानाचाही अडसर येत नाही. नाव, नियम याचबरोबर, सांघिक राहणी व श्रमविभागणी याही गोष्टी, अपरिहार्यपणे, दोन्हीकडे येतात. मला वाटते, केवळ व्यवस्थेच्या गरजांतून आलेले असे हे वरवरचे साम्य आहे. बाकी मूलभूत फरकच जास्त आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. विशेषतः आजची काही गुरुकुले ही केवळ वंचितांच्या मुलांसाठी शिक्षणकार्य करणारी आहेत. तर काही या मुलांबरोबर अवंचितांची मुलेही घेऊन सामाजिक समरसता साधण्याचा प्रयत्न करताहेत. काही वसतीगृहात्मक तर काही रात्रीसाठी मुलांना ठेवून न घेणारी आहेत. निवासी गुरूकुलांतून असणारी मुले, बहुदा, दूरच्या ठिकाणांहून आलेली असतात. तर केवळ दिवसा गुरूकुलांतून जवळची आसपासची मुले असणार हे उघडच आहे. काही गुरूकुलांतून मुले निवासी नसतात पण, दिवसभरचे शालेय पाच-सहा तास सोडून, अधिक तास मुलांना ठेवून घेतात. औपचारिक शिक्षणाव्यतिरिक्त इतरही अनेक, कला,क्रीडा, योगासने, संस्कार अशा अन्य गोष्टींसाठी राखीव वेळ ठेवला जातो. मुले अधिक वेळ असोत वा पूर्णवेळ असोत, त्यांचा दैनंदिन शालेय शिक्षणाव्यतिरिक्तचा लाभलेला वेळ मला फार मोलाचा वाटतो. जे शिक्षक किंवा संस्थाचालक हा अतिरिक्त वेळ, शालेय अभ्यासच पुन्हा घटवून घेण्यासाठी वापरतात ते, अंतिमतः मुलांचे यांतून नुकसानच करतात.

शिक्षण ही केवळ शालेय विषयांच्या शिक्षणापेक्षा अधिक व्यापक अशी संकल्पना आहे. आणि विद्यार्थीसुध्दा शाळेच्या वेळापत्रकांनी बध्द असलेल्या वेळात जेवढे शिकतात, त्यापेक्षा कितीतरी अधिक आणि कितीतरी वेगळे, शाळेच्या व्यतिरिक्तच्या वेळांत शिकत असतात, शिकू शकतात. त्यामुळे पूर्ण वेळच्या असो किंवा अर्धवेळच्या असो, गुरूकुलांमधून, या अतिरिक्त वेळेचा वापर कशासाठी आणि कशाप्रकारे केला जातो, त्यावरच त्या गुरूकुलाची उपयुक्तता ठरत असते. आपण, मुलाच्या विकासाबाबतच्या आपल्या विचारांनी किंवा कल्पनांनी मुलांचे दैनंदिन वेळापत्रक न ठरविता, मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक व बौद्धिक गरजांच्या अंगाने, उपक्रम ठरवून, वेळापत्रक ठरवायचे असते. उदाहरणार्थ, मुलांची दिवसभरात झोप पुरी व्हावी लागते. दिवसभरात तुकड्या-तुकड्यांनी शिकलेले, आत्मसात होण्यासाठी झोपेच्या काळातच मेंदू संघटित करीत असतो. मुलांना स्वतःचा म्हणून रिकामा वेळ हवा असतो, यात त्यांची स्वतःची मुक्त मनाने केलेली व्यक्तिमत्त्वाची तयारी होत असते. मुलांना विविधांगी, नि भरपूर शालाबाह्य अनुभव मिळण्यावरच त्यांची जीवनभरणी होणार असते; हे अनुभव मिळण्याची सोय सदैव वेळापत्रकात असावी लागते. अशा अनेक बाबी मुलांना समृध्द बालजीवन जगण्यासाठी आवश्यक असतात, आणि त्यासाठी उपलब्ध असलेला जादा वेळ गुरुकुलांनी वापरायला हवा. प्रभुणे यांच्या गुरुकुलमध्ये, औपचारिक शिक्षणापेक्षा अनौपचारिक व्यक्तिगत आणि सांघिक अनुभवांना विशेष स्थान आहे. इतर शाळांतून ज्ञानाच्या नावाने दिल्या जाणा-या माहितीच्या साठ्यापेक्षा, येथे, मुलांना रोजगारक्षम बनविणा-या कौशल्यांच्या शिक्षणावर भर दिला जातो. विविध बारा

प्रकारची कौशल्ये आजच विद्यार्थ्यांपुढे संधीरूपाने ठेवली आहेत. इथले वैशिष्ट्य असे आहे की, ज्या विशिष्ट पारंपरिक व्यावसायिक कुटुंबांतून येथली मुले आली आहेत, त्या व्यवसायांना आधुनिकता पुरवतील अशा शिक्षणसंधी या मुलांपुढे ठेवल्या आहेत. येथे परंपरा आणि आधुनिकता यांची सांगड घालून आपलेच कौटुंबिक व्यवसाय समृध्द करण्याची संधी दिली जात आहे. ग्रामीण मुलांना आधुनिक जगाशी याप्रकारे जोडण्याबरोबरच, ग्रामीण दारिद्र्याच्या परिस्थितीवर आघात करण्याची एक नवी दिशा इथे पकडलेली दिसते.

गिरीश प्रभुणे यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे, ग्रामीण वंचितांच्या वास्तवाचे भान आणि समाजाच्या पायाभूत प्रश्नांची जाण असणा-या शास्त्रज्ञाचे आहे, असेच मला नेहमी वाटत आले आहे.

❖